MHGO060005762021

नि.दि.दा.क्र.४०/२१
गोविंदा -वि- सरपंच +१

## नि.क्र.५ वरील आदेश :-

प्रस्तुतचा अर्ज वादीने अनुसुची ३९ नियम १ व २ दिवाणी प्रक्रिया संहिता अन्वये प्रतिवादींनी वादीचे मालकी हक्क, कब्जा व वहीवाटीतील मौजा कोरंबी त. सा. क्र. १९ येथील गट क्र. ११४ आराजी ०.६८ हेआर या शेतजमिनीस अडथळा करु नये म्हणून तात्पुरता मनाई हुकूम मिळणे बाबत दाखल केलेला आहे.

२) वादीचे कथन थोडक्यात खालील प्रमाणे -

वादी यांच्या मालकी हक्काची, कब्जा व वहीवाटीतील मौजा कोरंभी त. सा. क्र. १९ ता. अर्जुनी/मोरगांव जि. गोंदिया येथील गट क्र. ११४ आराजी ०.६८ हेआर ही कास्तकारी शेतजमिन असून सदर शेतजमिनीवर वादीच्या कुटुंबियाचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. सदर शेतजमिनीच्या चतुर्सिमा पुर्वेला-वनविभाग गट क्र. ११७ व सरकारी गट नं. ११५, पश्चिमेला-सरकारी रोड, उत्तरेला-सरकारी गट नं. ११५ व दक्षिणेला-सरकारी रोड येणेप्रमाणे आहेत. वादीच्या मालकी, कब्जा व वहीवाटीतील दाव्यातील शेतजमिनीशी प्रतिवादींचा कोणताही हितसंबंध, हक्क व अधिकार नसतांनी मागील सन २०१८ च्या कालावधीमध्ये प्रतिवादींनी वादीच्या कुटुंबियांचा विचार न करता तसेच वादीचे हित लक्षता न घेता प्रतिवादींनी रोजगार हमी योजनेअंतर्गत वादीच्या मालकीच्या गट नं. ११४ मध्ये माती काम टाकणे सुरु केले. त्यावेळी वादीने प्रतिवादींना तोंडी व लेखी स्वरुपात अर्ज देवून गट नं. ११४ मध्ये करीत असलेले माती काम बंद करावे म्हणून विनंती केली परंतु प्रतिवादींनी त्याकडे दुर्लक्ष करुन वादीच्या मालकीच्या जागेत मातीकाम केले होते. त्यावेळी वादीने गावाच्या विकासाच्या व हिताच्या

दृष्टीकोनातून विचार करुन त्या कामात कोणताही अडथळा केला नाही. वादी हा समाजातील अतिशय शांतताप्रिय व न्यायप्रिय व्यक्ती आहे.

३) पुढे वादीने असे कथन केले की, वादीने कोणत्याही शासकीय जागेवरील बोळीमध्ये भात पिकाची लागवड केली नाही. त्याने यावर्षी हंगामात आपल्या मालकीच्या दाव्यातील शेतजमिनीमध्ये वाहीत केलेली आहे. तरीसुध्दा प्रतिवादी क्र. १ ने वादीला दिनांक ०९.०६.२०२१ रोजी नियमबाहयरित्या व बेकायदेशीरपणे नोटीस दिली. त्या नोटीसला वादीने आपले वकीलामार्फत दिनांक १४.०६.२०२१ रोजी उत्तर व स्पष्टीकरण सादर केले. प्रतिवादी क्र. १ हिने पुन्हा चिडून जावून लगेच दिनांक १४.०६.२०२१ रोजी व त्यानंतर दिनांक २३.०६.२०२१ रोजी वादीला नोटीस दिली. वास्तविक वादीने कोणत्याही शासकीय बोळीमध्ये अतिक्रमण केलेले नसतांनी सुध्दा वादीला त्यांच्या मालकी, कब्जा व वहीवाटीतील दाव्यातील शेतजमिनीतून बेदखल करण्याचा प्रयत्न प्रतिवादी करीत आहेत. वादी हे अतिशय म्हातारे गृहस्थ असून सदर दाव्यातील शेतजमिनीवर वादीचे संपूर्ण कुटुंब अवलंबून असल्यामुळे प्रतिवादीने बेकायदेशीरपणे वादीला सदरच्या शेतजमिनीवरुन बेदखल केल्यास वादीच्या कुटुंबियांवर उपासमारीची पाळी येईल. प्रतिवादी क्र. १ हिचे वादीसोबत पटत नसल्याने ती सरपंच या पदाचा दुरुपयोग करुन प्रतिवादी क्र. २ सोबत संगनमत करुन बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करुन मुजोरीच्या भरवश्यावर वादीला दाव्यातील शेतजमिनीमधून कधीही बेदखल करतील याचा नेम राहीला नाही. प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाली होण्यास बराच कालावधी आहे. म्हणून वादीने तात्पुरता मनाईचा अर्ज दाखल केला आहे.

४) प्रतिवादींनी नि.क्र.२० वर आपले म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादी कथन करतात की, मौजा कोरंभी येथील गट क्र. ११४ आराजी ०.६८ हेआर ही जमिन वादीची आहे याबाबत वाद नाही. मौजा कोरंभी येथील गट क्र. ११५ हे महाराष्ट्र सरकार पाण्याखाली ०.८४ हेआर ची आमबोडीची जमिन आहे. सदर जमिन ही तलाव स्वरुप बोडी आहे. सदर बोडी खोली करण्यासाठी काम असल्याने गावातील पाणी टंचाई लक्षात घेवून आमबोडीच्या खोली करणासाठी व बोडीच्या पाळीच्या मातीकामासाठी प्रस्ताव

तयार करण्यात आला. त्यामुळे प्रतिवादी यांनी रितसर गट क्र. ११५ ची दिनांक ०३.०५.२०१८ रोजी भुमीअभिलेख कार्यालय मार्फत हद्द कायम करुन घेतली व गट क्र. ११५ आराजी ०.८४ हेआर मध्ये माती काम करण्यात आले. त्यावेळी गावातील सर्व नागरिक व वादी हजर होते परंतु वादीला मोजणी मान्य नव्हती. परंतु वादीने मोजणी नकाशाला किंवा मोजणीला वरिष्ठांकडे आव्हान केले नाही. वादी यांनी सदर शासकीय कामात अडथळा निर्माण करण्यासाठी दिनांक १५.०५.२०१८ रोजी मा. तहसिलदार अर्जुनी/मोरगांव यांना पत्र लिहून सदर शासकीय योजनेतील काम बंद करण्यासाठी विनंती केली होती. सदर पत्राला उत्तर देतांनी वादीने आपल्या मालकीची गट क्र. ११४ आराजी ०.६८ हेआर या जमिनीची मोजणी करुन हद्द कायम करण्यात यावे असे सुचित करण्यात आले होते परंतु प्रतिवादींनी सदर सुचनेकडे लक्ष दिले नाही.

५) प्रतिवादी पुढे असे कथन करतात की, वादीने दिनांक ०८.०५.२०१८ रोजी ॲड. लध्दानी यांचेकडून प्रतिवादींना नोटीस पाठविली. दिनांक १८.०५.२०१८ रोजी प्रतिवादी यांनी आपले विधिज्ञ ॲड. जी. डी. अवचटे यांच्यामार्फत उत्तर दिले होते तेव्हापासून वादी चुप बसला. त्यानंतर वादीने या वर्षी सदर बोडीची पाळ फोडून भात पिकाची लागवड करण्याचा प्रयत्न केला होता. वादीला गट क्र. ११५ मध्ये अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करु नये म्हणून सुचना दिली होती परंतु वादीने सदर सुचनेकडे लक्ष दिले नाही. गट क्र. ११५ च्या जमिनीमध्ये १० x १० चौफुट एवढया भागात परे टाकले होते. सदर बाब प्रतिवादीच्या लक्षात आल्यानंतर प्रतिवादी यांनी ग्रामपंचायत अधिनियम मधील तरतुदीच्या सहाय्याने वादीचे परे ग्रामपंचायतचे यंत्रणेव्दारे काढून फेकून दिले. आजरोजी गट क्र. ११५ चे संपूर्ण हद्दीमध्ये बोडीचे पाणी भरलेले आहे. त्यानंतर पुन्हा वादीने आपले विधिज्ञ श्री केसलकर यांचेमार्फत खोटी व बनावटी नोटीस पाठविली. वादी याने पुन्हा दिनांक १९.०६.२०२१ रोजी गट क्र. ११४ च्या अनुषंगाने प्रतिवादीला नोटीस पाठविली त्यानंतर दिनांक ०५.०७.२०२१ रोजी पुन्हा ग्रामपंचायतला नोटीस पाठविली. पुन्हा दिनांक १०.०७.२०२१ रोजी गट क्र. ३२ आराजी १.०० हेआर या जमिनीविषयी नोटीस पाठविली. प्रतिवादी यांनी वादीचे गट क्र. ११५ मध्ये अतिक्रमण

करण्याचे संपूर्ण मनसुबे हानून पाडले त्यामुळे वादीने खोटा मनसुबा बाळगून प्रतिवादींविरुध्द खोटा दावा दाखल केलेला आहे. वादीचा दावा किंवा तात्पुरत्या ताकीदीचा अर्ज मंजुर झाल्यास वादी हा मौजा कोरंभी येथील गट क्र. ११५ च्या बोडीमध्ये भविष्यात अतिक्रमण करेल व त्यामुळे गावातील लोकांना त्याचा परीणाम भोगावा लागेल. म्हणून प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

६) अर्ज नि.क्र.५ वाचला. वादपत्र नि.क्र.१ चे अवलोकन केले. प्रतिवादीने दाखल केलेली कैफीयत वाचले. अभिलेखावरील दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

७) वादीतर्फे विधीज्ञ श्री. आर. डब्ल्यु. केसलकर आणि प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. जी. डी. अवचटे यांचा युक्तिवाद ऐकला.

८) वरील कथनावरुन माझ्या विचारार्थ निघालेले मुद्दे, त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे -

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादी यांनी तात्पुरता मनाई हुकूम मिळणेसाठी सकृत दर्शनी केस सिध्द केली आहे का ? | होकारार्थी. |
| २) | न्यायाचा तराजू वादीच्या बाजुने आहे काय ? | होकारार्थी. |
| ३) | तात्पुरता मनाई हुकूम दिला नाही तर वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | होकारार्थी. |
| ४) | आदेश काय ? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

### मुद्दे क्र.१ ते ३ बाबत :-

९) सदरील तिनही मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदरील तिनही मुद्दे एकत्र चर्चेसाठी घेत आहे.

१०) वादीने प्रस्तुत अर्जामध्ये असे कथन केले आहे की, वादीचे मालकी, कब्जा व वहीवाटीतील मौजा कोरंभी येथील गट क्र. ११४ आराजी ०.६८ हेआर असून त्या जागेवर प्रतिवादी अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. प्रतिवादींनी रोजगार हमी योजनेअंतर्गत वादीच्या मालकीच्या गट क्र. ११४ मध्ये माती काम केले होते. दिनांक ०९.०६.२०२१ रोजी वादीने शासकीय जागेवरील बोडीमध्ये भात पिकाची लागवड केली नसतांनी देखील प्रतिवादींनी नियमबाहयरित्या व बेकायदेशीरपणे वादीला नोटीस दिली. वादी यांचे कोणत्याही शासकीय बोडीमध्ये अतिक्रमण नसतांनी सुध्दा प्रतिवादी वादीला दाव्यातील शेतजमिनीतून बेदखल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. वादीने आपले कथनाच्या पुष्ठीयर्थ भुमापन क्र. ११४ च्या सात बारा उता-याची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. सदर सात बारा उता-याचे अवलोकन केले असता सदर गटावर वादीचे भोगवटदार म्हणून नाव दिसून येत आहे. वादीने पुढे गट क्र. ११४ चा गाव नमुना सात दाखल केलेला आहे. सदर गाव नमुना सात चे अवलोकन केले असता भोगवटदाराचे नाव वादी गोविंदा लुला शेंडे क्षेत्र ०.६८ असल्याचे दिसून येते. वादीने पुढे सिमांकन प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. त्यावरुन गट क्र. ११४ च्या आराजी ०.३८ क्षेत्राच्या उत्तरेस गट क्र. ११५ महाराष्ट्र सरकार पाण्याखाली ०.८४ क्षेत्र दिसून येत आहे. वादीने पुढे सरपंच ग्रामपंचायत कोरंभी यांनी मुंबई ग्रामपंचायत १९५८ चे कलम ५२ व ५३ चे उल्लंघन केल्याबद्दल त्यांना दिलेल्या नोटीसची प्रत दाखल केलेली आहे. त्या मध्ये प्रतिवादीने वादीस गाव हिताच्या दृष्टीतून बोडीत पाण्याची व्यवस्था राखून ठेवणे आवश्यक आहे परंतु त्या ठिकाणी भात पिकाची लागवड केल्याने वादीस नोटीस दिल्याचे दिसून येत आहे. पुढे वादीने प्रतिवादी यांनी त्यास दिलेल्या अतिक्रमण हटविण्याबाबत नोटीसा दाखल केलेल्या आहेत. वादीने पुढे आपले विधिज्ञमार्फत

प्रतिवादी यास पाठविलेल्या नोटीसची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदर नोटीसचे अवलोकन केले असता यावर्षी हंगामात वादीने आपले मालकी कब्जा व वहीवाटीत असलेल्या गट क्र. ११४ आराजी ०.६८ हेआर शेतजमिनीमध्ये मशागत केली आहे, त्यांनी कोणत्याही शासकीय जागेवरील बोडीमध्ये भातपिकाची लागवड केली नाही तरी सुध्दा तुम्ही नोटीस घेणार यांनी नियमबाहयरित्या व बेकायदेशीरपणे वादीस मुंबई ग्रामपंचायत अधिनियमचे कलम ५२ व ५३ अंतर्गत नोटीस दिल्याचे त्यामध्ये नमूद केलेले आहे. प्रतिवादी यांनी आपले उलट तपासादरम्यान परिच्छेद क्र. २ ला उत्तर देतांना स्पष्टपणे मान्य केले आहे की, मौजा कोरंभी येथील गट क्र. ११४ आराजी ०.६८ हेआर ही शेतजमिन वादीची आहे. प्रतिवादींना दाव्यातील चतुर्सिमेविषयी ही वाद नाही.

११) याउलट प्रतिवादीने कथन केले आहे की, मौजा कोरंभी येथील गट क्र. ११५ हे महाराष्ट्र सरकार पाण्याखाली ०.८४ हेआर ची आमबोडीची जमिन आहे. सदर जमिन ही तलाव स्वरुप बोडी आहे. सदर बोडी खोली करण्यासाठी काम असल्याने गावातील पाणी टंचाई लक्षात घेवून आमबोडीच्या खोली करणासाठी व बोडीच्या पाळीच्या मातीकामासाठी प्रस्ताव तयार करण्यात आला. त्यामुळे प्रतिवादी यांनी रितसर गट क्र. ११५ ची दिनांक ०३.०५.२०१८ रोजी भुमीअभिलेख कार्यालय मार्फत हद्द कायम करुन घेतली व गट क्र. ११५ आराजी ०.८४ हेआर मध्ये माती काम करण्यात आले. त्यावेळी गावातील सर्व नागरिक व वादी हजर होते परंतु वादीला मोजणी मान्य नव्हती. प्रतिवादीच्या कथनानुसार आजरोजी गट क्र. ११५ च्या संपूर्ण हद्दीमध्ये बोडीचे पाणी भरलेले आहे. वादी हा बोडीचे पार फोडून भातपिकाची लागवड करुन गट क्र. ११५ मध्ये अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करीत होता. तसेच वादीने गट क्र. ११५ च्या बोडीच्या जागी जमिनीत परे भरण्याचा प्रयत्न केला परंतु वादीचे सदर मनसुबे उधळून लावल्यामुळे प्रतिवादींनी खोटा दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी आपल्या कथनाच्या पुष्टीयर्थ वादीने मा. तहसिलदार अर्जुनी/मोरगांव यांना लिहीलेल्या पत्राची प्रत दाखल केलेली आहे. त्यानंतर त्यांनी गट क्र. ११४ चा सात बारा उतारा दाखल केलेला आहे त्यावरुन देखील गट क. ११४ च्या भोगवटदाराच्या नावामध्ये वादीचे नाव दिसून येत आहे. पुढे सरपंच ग्रामपंचायत कोरंभी यांनी वादीच्या पत्राला दिलेल्या उत्तराची प्रत

दाखल केलेली आहे त्यामध्ये सरपंचाने वादीस विनाकारण शासकीय कामात अडथळा निर्माण करण्याचा तुम्ही प्रयत्न करीत आहात. तुम्ही आपले मालकीचे गट क्र. ११४ आराजी ०.६८ हेआर या जमिनीची मोजणी करुन हद्द कायम करुन घ्यावी असे कळविल्याचे दिसून येते. प्रतिवादीने पुढे वादीने आपले विधिज्ञ मार्फत त्यांना पाठविलेल्या नोटीसची व त्यांनी वादीस पाठविलेल्या नोटीसच्या उत्तराची प्रत दाखल केलेली आहे. तसेच मासिक सभा प्रोसीडींग रजिस्टची प्रत देखील दाखल केलेली आहे. पुढे सरपंच कोरंभी यांनी अर्जुनी/मोरगांव ला दिलेल्या रिपोर्टची प्रत दाखल केलेली आहे. उपरोक्त सर्व नोटीस व कागदपत्राचे अवलोकन केले असता गट क्र. ११४ आराजी ०.६८ हेआर वादीच्या ताब्यात असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. प्रस्तुत प्रकरणामध्ये सध्याच्या टप्प्यावर कुठलीही मोजणी किंवा हद्द कायम झाल्याचे दिसून येत नाही. प्रतिवादींनी गट क्र. ११४ आराजी १६८ हेआर ही जमिन वादीची असल्याचे मान्य केलेले आहे.

१२) या पुष्ट्यर्थ प्रतिवादींनी खालील न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे.

1. *SulemanKhan s/o Mumtajkhan and Ors. Vrs Bhagiratibai wd/o Digambar Asalmol and Anr.*, 2014(4) Mh.L.J., wherein it was held that,

> " When suit involving boundary dispute between the parties then court must ascertain that a map is drawn to the appropriate scale by competent government official from the office of TILR or DILR. "

2. *Laxman Wamanrao Nagapure vrs Shankar Haribhau Adhau & Anr. 2014(3) MhLJ* , wherein it was held that,

> "In a suit for removal of encroachment and for possession of immovable property, plaintiff must describe suit property sufficiently to identify appropriately the boundaries thereof. "

१३) वरील न्यायनिर्णयातील तथ्ये व परिस्थीती प्रस्तुत प्रकरणातील तथ्ये व परिस्थीतीशी भिन्न आहेत. उपरोक्त लक्ष्मण वामनराव नागापुरे विरुध्द शंकर या न्यायनिर्णयामध्ये दावा हा अतिक्रमण काढण्यासंदर्भात व ताब्यासंदर्भात होता. तसेच गट क्र. ११४ आराजी ६८ हेआर जागेवर वादीने तो स्वतः असल्याचे दाखवून दिलेले आहे. तसेच प्रतिवादींना देखील गट क्र. ११४ आराजी ०.६८ हेआर ही जमिन वादीची आहे याबाबत वाद नाही. त्यामुळे उपरोक्त नमुद न्यायनिर्णयांचा फायदा प्रतिवादींना होत नाही. या सर्व बाबींचे बारकाईने अवलोकन केले असता प्रथम दर्शनी असे दिसून येते की, वादीचे वाद मिळकतीवर ताबा, कब्जा व वहीवाट असून त्यांना प्रतिवादींकडून अडथळ्याची होत आहे व अडथळा होण्याची भिती आहे. वादीने प्रथम दर्शनी केस त्यांच्या बाजूने असल्याचे शाबीत केलेली आहे.

१४) वादीचे कथनाप्रमाणे वादीचे वाद मिळकतीवर ताबा, कब्जा व वहीवाट असून प्रतिवादी हे वादीच्या ताब्यात अडथळा करीत आहेत की कसे या मुद्यावर अद्यापी न्यायालयासमोर चौकशी होउन गुणावगुणावर न्यायनिर्णय होणार आहे. सध्यातरी न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने आहे. एकंदरीत प्रस्तुतचा अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील दाखल कागदपत्र पाहता तात्पुरत्या मनाई हुकूमाचा आदेश दिल्यास प्रतिवादींचे नुकसान होणार नाही. सबब मी मुद्दे क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

<u>मुद्दा क्र.४ बाबत</u> :-

१५) मुद्दे क्र.१ ते ३ च्या निष्कर्षांच्या अनुषंगाने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यांत येत असुन मुद्दा क्र.४ साठी मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## <u>आदेश</u>

१) प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यांत येत आहे.

२) प्रतिवादी यांनी स्वतः अथवा त्यांचे नातेवाईक किंवा इतर कोणामार्फतही मौजा कोरंभी त. सा. क्र. १९ येथील गट क्र. ११४ आराजी ०.६८ हेआर या दाव्यातील शेतजमिनीमध्ये

वादीचे शांततामय कब्जा, ताबा व वहीवाटीला दाव्याच्या अंतिम निर्णयापर्यंत कोणत्याही प्रकारे अडथळा करु नये, असा तात्पुरता मनाई हुकूम देण्यात येत आहे.

३) वादीने खर्च सोसावा.

(पी. एस. सोनकांबळे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ट स्तर,
अर्जुनी/मोरगाव

दि.२२/०४/२०२२.

***<u>CERTIFICATE</u>***

This is to certify that, the contents of this uploaded judgment/order are same and correct as per the original judgment/ order, signed by the Presiding Officer.

Date of judgment/order : 22/04/2022
Date of uploading the judgment/order : 25/04/2022
Uploaded by Stenographer – Sau. P. D. Bawankar